नाशिक महानगरपालिका नाशिक
मध्यवर्ती भांडार विभाग
कोटेशन नोटीस २०१७

नाशिक महानगरपालिकेस खालील तक्त्यात नमुद केलेले साहित्य पुरविणेकामी वार्षिक दर मंजुर करुन त्या दराने काम करणेस अनुभवी पुरवठादार व व्यावसायिक यांचेकडुन कोटेशन मागविण्यत येत आहे .

| अ.क्र | तपशिल | अंदाजे प्राकलन |
| --- | --- | --- |
| १ | नाशिक महानगरपालिकेतील आस्थापना विभाग (मुख्यालय) कार्यालयासाठी स्पायरल बांईडिग मशिन व इतर साहित्य पुरविणे कामी दर मंजुर करुन त्या दराने पुरवठा करणे . | १२,०००/ - |

अटी / शर्ती

१) वरील कामाचे कोटेशन पत्रक (अटिशर्तीसह www.nashikcorporation.in) या संकेत स्थळावर दि . २२/९/२०१७ ते दि. २९/९/२०१७ या कालावधीत उपलब्ध आहे .
२) कोटेशन पाकिट सादरीकरणाची अंतीम मुदत दि .३/१०/२०१७ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत राहील . मुदतीनंतर प्राप्त झालेले कोटेशन पाकिट स्विकारले जाणार नाही .
३) सदरचे साहित्य नाशिक महानगरपालिका मुख्यालय किंवा आदेशात नमुद केल्याठिकाणी पोहोच करावे लागेल . त्यासाठी वेगळा वाहतुक खर्च देण्यात येणार नाही.
४) सदरचे दरपत्रकात सर्व करासह व स्पेअरपार्ट बसविणेचे मंजुरीसह दर नमुद करावयाचे आहेत . कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही .
५) कोणतेही कोटेशन स्विकारणे अगर नाकारण्याचा अधिकार निन्मस्वाक्षरीकार यांचा राहील.

**Sd/-**
**उप.आयुक्त (स्था.सं.क)**
**नाशिक महानगरपालिका नाशिक**

नाशिक महानगरपालिका , नाशिक

मध्यवर्ती भांडार विभाग

कोटेशन फॉर्म २०१७

**कामाचे नाव ;-** नाशिक महानगरपालिकेतील आस्थापना विभाग (मुख्यालय) कार्यालयासाठी स्पायरल बांईडिग मशिन व इतर साहित्य पुरविणेकामी दर मंजुर करुन त्या दराने पुरवठा करणे .

**कामाची मुदत ;-** ७ दिवस

**महत्वाची सुचना ;-** कोटेशन सोबत शॉप ॲक्ट लायसन्सची प्रमाणित प्रत तसेच जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे . त्याशिवाय कोटेशनचा विचार केला जाणार नाही .

**कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत ;-** दि. २९/९/२०१७ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत

**कोटेशनधारकाचे नाव व पत्ता ;-** -----------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**संपर्क क्रमांक ;-**

उक्त प्रमाणे कामाचे अटीशर्ती व स्पेशिफ़िकेशननुसार साहित्य पुरविणेकामी मी / आम्ही

| अ.क्र | तपशिल | दर सर्व करासह रक्कम रु | प्रमाण / एकक युनिट |
|---|---|---|---|
| १ | स्पायरल मशिन | | १ नग |
| २ | स्पायरल वायर | | ५ किलो |
| ३ | स्पायरल शिट A ४ | | २००नग |
| ४ | स्पायरल शिट लिंगल | | २०० नग |

सदर कोटेशनसोबत असलेल्या सर्व अटि शर्ती मी वाचले असुन मला त्या मान्य आहेत . सदर अटी शर्ती प्रमाणे सदर कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दराने , मंजुर नमुन्यानुसार पुरवठा करण्यास मी तयार आहे . त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे .

निविदाधारकाची सही व शिक्का

नाशिक महानगरपालिका , नाशिक
मध्यवर्ती भांडार विभाग
सर्व साधारण अटी शर्ती (कोटेशन)

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही . सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल .
२) कोटेशन नोटिस मध्ये नमुद केलेली संख्या ही अंदाजे असुन त्यामध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे .
३) दिलेल्या मुदतीमध्ये संपुर्ण मालाचा पुरवठा करणे / काम करणे / सेवा पुरविणे आवश्यक आहे काही अपरिहार्य कारणास्तव मालाचा पुरवठा करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणेबाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहिल . तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतिम राहील .
४) ज्यांची संपुर्ण किंवा भागशः कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र रु १२०/- चे जनरल स्टॅम्पपेपर वर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल . तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल .
५) जी.एस.टी करासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे . कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही .
६) मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास / काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास अशा उशिरा प्राप्त झालेल्या मालावर / केलेल्या कामावर / सेवा पुरविण्याच्या रकमेवर दर हजारी दर दिवसाला र . रु १ याप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .
७) सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार पुरवठा करणे बंधनकारक राहील
८) एकुण बिलाच्या रक्कमेतुन का माचे स्वरुप विचारात घेता आवश्यकतेनुसार ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात येईल . मालाचा पुरवठा झाल्यानंतर सहा महिन्यापर्यंत मालाच्या दर्जाबाबत काही तक्रार न आल्यास अथवा प्रयोजनाचा हेतु पुर्ण झाल्यानंतर मागणीनुसार सदरची रक्कम परत करण्यात येईल
९) मुदतीत मालाचा पुरवठा न झाल्यास / मुदतीत काम पुर्ण न केल्यास सदरचा माल / काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहुन करुन घेण्यात येईल आणि त्या कामी महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .
१०) मंजुर नमुन्याप्रमाणे / स्पेशिफ़िकेशनप्रमाने मालावर पुरवठा न झाल्यास /काम न झाल्यास माल परत करण्यात येईल /अथवा सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.
११) कोणताही माल मंजुर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडुन खरेदी करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही . याबाबत कोटेशनधारकास नुकसानभरपाई मागता येणार नाही .
१२) अटी / शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील .
१३) कोटेशन दर मंजुर झालेनंतर सदरच्या मालाच्या दरात / कामाच्या दरात/सेवेच्या/दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पसे मिळणार नाही .
१४) पुरवठाधारकाने अटिशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातुन रक्कम जप्त करण्यात येईल.

Sd/-
उपआयुक्त तथा
खाते प्रमुख म.भांडार विभाग
नाशिक महानगरपालिका नाशिक

सदरचे अटी शर्ती मी वाचल्या असुन सदरच्या अटी शर्ती मान्य व कबुल असुन त्याप्रमाने माल पुरविण्यास / सेवा पुरविण्यास / काम करण्यास मी तयार आहे . त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का